P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** दिनांक -१७/०९/२०२२

## पिंपरी चिंचवड पोलीस दलातील उल्लेखनिय कामगिरी केलेल्या ८ महिला पोलीस अंमलदारांचा स्मार्ट ई-बाईक देवुन गौरव.

## द्रुव गृप व टाईम्स गृप यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन.

आज दिनांक १७.१०.२०२२ रोजी पोलीस मुख्यालय, निगडी येथे द्रुव गृप व टाईम्स गृप यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड पोलीस दलात उल्लेखनिय कामगिरी केल्या बद्दल ८ महिला पोलीस अंमलदार यांना मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे हस्ते स्मार्ट ई-बाईक वाटपाचे आयोजन करण्यात आले.

या मध्ये १. श्रीमती. एम.आर. गायकवाड (महिला सहायक पोलीस फौजदार) नेमणूक निगडी पोलीस ठाणे यांनी उत्कृष्ठ तपास व एन.डी.पी.एस ॲक्ट अंतर्गत १,४०,५६६/- रुपये किंमतीची मुद्देमाल जप्त करुन उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. २. श्रीमती. सुवर्णा थेउरकर (महिला सहायक पोलीस फौजदार) नेमणूक भोसरी वाहतुक विभाग यांनी उत्कृष्ठ वाहतुक नियोजन व नियमन करुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. ३. श्रीमती. ए.पी. बोरकर (महिला पोलीस हवालदार) नेमणूक भोसरी पोलीस ठाणे यांनी कोव्हीड १९ च्या कालावधीत जीवाची पर्वा न-करता उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. ४. श्रीमती. तनुजा चौधरी (महिला पोलीस हवालदार) नेमणूक वाकड पोलीस ठाणे यांनी सी.सी.टी.एन.एस या कार्यप्रणालीवर सर्व गुन्ह्यांची माहिती वेळेत अद्ययावत करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. ५. श्रीमती. शालिनी वचकल (महिला पोलीस हवालदार) नेमणूक हिंजवडी पोलीस ठाणे यांनी जनतेशी सौहार्दपुर्ण जनसंवाद आणि मिसींग व्यक्ती तसेच महिला विषयक तक्रारींचे निरसन करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. ६. श्रीमती. सुरेखा देशमुख (महिला पोलीस हवालदार) नेमणूक मुख्यालय यांनी कोव्हीड १९ च्या कालावधीत जीवाची पर्वा न-करता उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. ७. श्रीमती. कविता धोंडगे (महिला पोलीस नाईक) नेमणूक देहुरोड पोलीस ठाणे यांनी सन २०२२ मधील जगत्‌गुरु श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळयामध्ये गर्दीचा फायदा घेवून पाकीट चोरी करणारे व चैन चोरी करणारे आरोपी निष्पन्न करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. ८. श्रीमती. कांचन पंडीत (महिला पोलीस नाईक) नेमणूक दिघी पोलीस ठाणे यांनी सन २०२२ मधील संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी बंदोबस्तचे उत्कृष्ठ नियोजन तसेच पासपोर्ट व चारित्र्य पडताळणी प्रकरणे संपुर्ण निर्गती करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

द्रुव गृप व टाईम्स गृप यांनी महिला पोलीसांनी केलेल्या उल्लेखनिय कामगिरीची दखल घेवून त्यांना स्मार्ट ई-बाईक देवुन त्यांच्या कार्याचा गौरव केल्याबद्दल आयोजकांचे व संपुर्ण टीमचे मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आभार व्यक्त करून उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या सर्व महिला पोलीस अंमलदारांना समाजामध्ये अधिक उत्कृष्ठ कर्तव्य बजावून पोलीस दलाचे नाव उज्वल करावे असे गौरवोद्‌गार करत मार्गदर्शन करुन पुढील कर्तव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेसह श्री. काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, श्री. सतीश माने सहायक पोलीस आयुक्त, प्रशासन श्री. रावसाहेब जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी, तसेच श्री. रतनदीप रे मुख्य व्यवस्थापक / द्रुव सॉफ्टवेअर कंपनी व संपुर्ण टीम आदी मान्यवर उपस्थित होते.

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड